# आदेश नि.क्र. ५ वर दिवाणी दावा क्र. १९/२०१९

वादींनी सदरचा नि.क्र. ५ वरील अर्ज हा प्रतिवादीं विरूध्द वादींच्या दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींनी स्वता: अगर त्यांच्या मार्फत इतर कोणीही वादींच्या कब्जास अडथळा आणु नये यासाठी तात्पुरता मनाईहुकूमाकरीता अर्ज दाखल केला आहे.

**०२.** वादींचे म्हणणे की, प्र.वादी क्र. १ ते ३ हे भाउ आहेत व वादी ही प्रतिवादी क्र. ३ ची पत्नी आहे. सदर बाब ही वादी व प्र.वादींनी नाकारली नाही. वादींच्या कथनानुसार, प्र.वादी यांचे वडील दत्तात्रय भिकाजी बंडरे यांची वडिलोपार्जीत मिळकत गट क्र. ६६ यांसी एकुण क्षेत्र ०१हे—५७आर अधिक पो.ख. ००हे—२२आर मौजे कन्हेरवाडी, ता.कळवण, जि.नाशिक ही मिळकत होती. प्र.वादींचे वडिल मयत झाल्यानंतर, प्र.वादी व त्यांची आई परेगाबाई यांचे नाव दावामिळकतीमध्ये नोंद क्र. १३३ अन्वये महसुल दप्तरी लावण्यात आले. वादी व प्र. वादी क्र. ३ यांनी परेगाबाई हीचा सांभाळ केल्यामुळे, परेगाबाई हीचा भविष्यातील १/४ हिस्सा म्हणजे ००हे—४०आर क्षेत्र हे दिनांक १३/०६/२०१४ रोजीच्या मृत्युपत्राव्दारे वादीच्या लाभांत लिहुन दिले आहे. सदर मृत्युपत्र हे दुययम निबंधक कार्यालय, कळवण यांच्या दप्तरी अ.क्र. ८०६/२०१४ अन्वये दोन साक्षीदारां समक्ष नोंदविण्यात आले आहे.

**०३.** परीगाबाई हीचे निधन दिनांक २७/०१/२०१७ रोजी झाले. त्यानंतर वादीने महसुल दप्तरी मृत्युपत्रा आधारे दावामिळकतीमध्ये परेगाबाई यांच्या ऐवजी स्वता:चे नांव लावण्यासाठी अर्ज दिला होता. सदर अर्जाला अनुसरून नोंद क्र. ४२४ करण्यात आली होती. तसेच, प्र.वादींनी देखील वारस हक्काने परेगाबाई हीच्या निधनानंतर त्यांचे नांव महसुल दप्तरी लावण्यासाठी अर्ज दिला. त्यानुसार नोंद क्र. ४२३ दप्तरी लावण्यात आली होती. प्रतिवादींनी वादींची नोंद क्र. ४२४ बाबत आक्षेप घेतल्याने सदरची नोंद, जोपर्यंत दिवाणी न्यायालयात सदर कुटूंबातील व्यक्तिंचा ठरवत नाही, तोपर्यंत मृत्युपत्राची अंमलबजावणी होउ शकत नाही, या निष्कर्षाने रद्द करण्यात आली होती. त्यामुळे वादीने सदरचा दावा हा दिनांक १३/०६/२०१४

रोजीच्या मृत्युपत्रान्वये वादी या दावामिळकतीमधील ००हे—४०आर क्षेत्राचे मालक झाले आहेत, असा ठराव करून मिळण्यासाठी व तीचा हिस्सा तुटक होउन मिळण्यासाठी आणि नोंद क्र. ४२३ ही बेकायदेशीर असुन प्रतिवादीं विरूध्द निरंतर ताकीदीसाठी सदरचा दावा दाखल केला आहे.

**०४.** प्र.वादी क्र. ३ हजर झाल्यानंतर त्यांनी त्यांचा लेखी जबाब व कैफियत नि.क्र. २१ द्वारे सदर दाव्यास व अर्जास दाखल केली आहे. प्र.वादी क्र. ३ ने वादीचा दावा मान्य केला आहे. प्र.वादी क्र. १ व २ यांनी नि.क्र. २६ द्वारे त्यांनी त्यांचा लेखी जबाब व कैफियत सदर दाव्यास व अर्जास दाखल केली आहे. प्र.वादी क्र. १ व २ हे पुणे येथे राहतात व प्र.वादी क्र. २ हे नोकरीनिमित्त नाशिक येथे राहतात. दत्तात्रय भिकाजी बंडरे हे हयात असतांना मयत परेगाबाई व दत्तात्रय हे एकत्र असतांना व दत्तात्रय यांच्या मृत्युनंतर सन २००८—०९ पर्यंत परेगाबाई ही ओतुर येथे राहत होती. प्र.वादी क्र. १ व २ यांनी वादी व प्र.वादींमध्ये असलेले नातेसंबंध तसेच वडिलोपार्जीत दावामिळकत या बाबी मान्य केल्या आहेत. प्र.वादी क्र. १ व २ यांच्या कथनानुसार दावामिळकतीचे आज रोजीपर्यंत सरस—निरस मानाने वाटप झाले नाही. प्र.वादी क्र. १ ते ३ हे परेगाबाई हीचे मुले असुन वादी ही सुन आहे. परेगाबाई हीने सुनेच्या लाभांत मृत्युपत्र लिहुन देण्यासाठी कोणतेही नैसर्गिक प्रेम नाही. परेगाबाई ही प्र.वादी क्र. ३ यांच्याकडे राहत असल्याचे प्र.वादी क्र. १ व २ यांनी मान्य केले आहे. तसेच, परेगाबाई ही प्र.वादी क्र. ३ यांच्याकडे राहत असतांना व अधुन—मधून प्रतिवादी त्यांच्या आईला भेटायला गेल्यास परेगाबाई यांनी कधीही त्यांच्यासमक्ष त्यांनी मृत्युपत्र करून दिल्याचे सांगितले नाही. तसेच, मृत्युपत्रामध्ये लावण्यात आलेले वैद्यकीय प्रमाणपत्र हा दस्त सरकारी रूग्णालयातील नाही. सदरचे मृत्युपत्र हे धोकाधडीने वादीने मयत परेगाबाई हीच्याकडुन केले आहे. त्यामुळे, वादींना दावामिळकतीमध्ये कोणताही कायदेशीर अधीकार नाही. परेगाबाई यांच्या मृत्युपत्रामध्ये प्र.वादी क्र. १ व २ यांचा कायदेशीर हिस्सा डावलला जाउ शकतो. वरील कारणांमुळे, प्र.वादी क्र. १ व २ यांनी सदरचा अर्ज खर्चासह रद्द करण्यांस विनंती केली.

**०५.** वरील कथनावरून या अर्जाचे निर्णयाकामी माझासमोर खालील मुद्दे प्रस्थापति होतात, त्या मुद्दयांचे निष्कर्ष मी कारणमीमांसासह खालीलप्रमाणे देत आहे—

| **अ. क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १ | वादींच्या बाजुने प्रथमदर्शनी केस दिसुन येते काय ? | : | — होय — |
| २ | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय ? | : | — होय — |
| ३ | तुर्तातूर्त मनाई अर्ज मंजूर न केल्यास कोणाचे अपरिमीत नुकसान होणार काय ? | : | — वादीचे — |
| ४ | आदेश काय ? | : | अर्ज मंजूर केला. |

## कारण मिमांसा

**०६.** वादी व प्र.वादींच्या वि. वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. वादींच्या वकीलांनी हिंदु उत्तराधिकार अधिनियम १९५६, कलम ६ प्रमाणे दावामिळकतीमध्ये १/४ हिस्सा हा मयत परेगाबाई हीची स्वकष्टार्जीत मिळकत झाली. त्यामुळे, हिंदु उत्तराधिकार अधिनियमच्या कलम १४ प्रमाणे परेगाबाई हीला मृत्युपत्र करून देण्याचा पुर्ण अधिकार असुन वादीचा १/४ हिस्सा दावामिळकतीमध्ये आहे. परंतु, वादीचे नांव महसुल दप्तरी नसल्याने, प्र.वादी हे वादीचा हिस्सा डावलण्यासाठी दावामिळकत ही त्रयस्थ इसमास तबदिल करू शकतात, त्यामुळे नि.क्र. ५ चा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

**०७.** याउलट, प्र.वादी क्र. १ व २ यांच्या वि. वकीलांनी सासु व सुन यांच्यामध्ये कोणतेही नैसर्गिक प्रेम नाही. अद्याप मिळकतीचे वाटप झाले नाही. मयत परेगाबाई हीने भविष्यात मिळणा—या वाटपाचे मृत्युपत्र हे वादींना करून दिले आहे. त्यामुळे, परेगाबाई हीला सदरचे मृत्युपत्र करून देण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार

नाही. त्यामुळे, वरील कारणांवरून प्र.वादींच्या वि.वकीलांनी सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**<u>मुद्दे क्र. १ ते ४ करीता –</u>**

**०८.** सदर मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने, पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांची चर्चा एकत्रीतपणे करण्यात येते. प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजुने झुकते अथवा नाही हे पाहण्यासाठी प्रथमतः मयत परेगाबाई हीला कायदयाने भविष्यात येणा–या हिस्याबाबत मृत्युपत्र करून देण्याचा अधिकार आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे. हिंदु उत्तराधिकारी अधिनीयम १९५६ अन्वये पतीच्या निधनानंतर दावामिळकत ही विधवा व तीच्या मुलांच्या हिस्याला जाते. त्यामुळे, महसूल दप्तरी दावामिळकतीबाबत परेगाबाई व प्र.वादी क्र. १ ते ३ यांची नांवे लावण्यात आली आहेत. याचाच अर्थ, परेगाबाई व प्र.वादी क्र. १ ते ३ यांचा समान हिस्सा सदर दावामिळकतीमध्ये आहे.

**९.** दावामिळकतीचे वाटप आजपावेतो झाले नाही, ही बाब वादी व प्रतिवादींनी नाकारली नाही. प्र.वादी क्र. १ व २ यांच्या कथनाप्रमाणे सन २००८–०९ पर्यंत दावामिळकतीमध्ये परेगाबाई हीचा कब्जा होता. वयोवृध्द असल्याने परेगाबाई ही त्यानंतर प्र.वादी क्र. ३ यांच्याकडे नाशिक येथे राहत होती. प्र.वादी क्र. १ व २ हे पुणे व नाशिक येथे राहतात. त्यामुळे, दावामिळकतीवर प्र.वादी क्र. १ व २ यांचा कब्जा नाही. तसेच, मयत परेगाबाई हीचा कब्जा दावामिळकतीवर सन २००८–०९ पर्यंत होता हे दिसुन येते.

**१०.** हिंदु उत्तराधिकारी अधिनियम, कलम १४ प्रमाणे हिंदु स्त्रीचा ज्या संपत्तीवर कब्जा आहे, तीची ती पुर्ण मालक म्हणुन गृहीत/धारण करेल. वरील कारणमीमांसावरून दावामिळकतीवर मयत परेगाबाई हीचा कब्जा होता, ही बाब प्रथमदर्शनी शाबीत होते. त्यामुळे, दावामिळकतीवर परेगाबाई हीचा संपुर्ण अधिकार होता हे सिध्द होते. परेगाबाई हीचा दावामिळकतीवर संपुर्ण अधिकार व कब्जा

असल्याने, हिंदु उत्तराधिकारी अधिनियम, कलम ३० अन्वये परेगाबाई हीला मृत्युपत्र करून देण्याचा अधिकार प्राप्त होतो.

**११.** परेगाबाई हीला मृत्युपत्र करून देण्याचा अधिकार आहे. प्र.वादी क्र. १ व २ यांनी सदरचे मृत्युपत्र हे धोकाधडीने करून घेण्यात आले आहे, असा युक्तिवाद केला. प्र.वादींच्या युक्तिवादाप्रमाणे मृत्युपत्रामध्ये दाखल केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र हे शासकीय रूग्णालयाने दिलेले नाही. वादीने कशाप्रकारे धोकाधडी करून मयत परेगाबाई हीच्याकडुन मृत्युपत्र करून घेतले, हे प्र.वादींनी सांगितले नाही. तसेच, वैद्य कीय प्रमाणपत्र हे शासकीय रूग्णालयातुन अदा करण्यात आलेले नाही. त्यामुळे, सदरचे मृत्युपत्र बेकायदेशीर आहे हे कायदयाने गृहीत धरता येणार नाही.

**१२.** परेगाबाई हीने नोंदणीकृत व दोन साक्षीदारांसमक्ष सदरचे मृत्युपत्र वादींच्या लाभांत करून दिलेले आहे. त्यामुळे सदरचे मृत्युपत्र हे कायदेशीर असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे, प्रथमदर्शनी झुकता तराजु वादीच्या बाजुने असल्याचे सिध्द होते.

**१३.** वादींच्या युक्तिवादाप्रमाणे, प्र.वादी हे दावामिळकतीवर त्रयस्थ इसमाचा बोजा निर्माण करून शकतात व दावामिळकत त्रयस्थ इसमाला तबदील करू शकतात. त्यामुळे नि.क्र. ५ मंजुर करण्याची विनंती केली. परेगाबाईच्या मृत्युपुर्वी दावामिळकतीवर तीचा कब्जा होता ही बाब प्रथमदर्शनी सिध्द झाली आहे. तसेच, मृत्युपत्रावरून प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजुने झुकत आहे. महसुल दप्तरी वादींचे नांव दावामिळकतीवर नाही. त्यामुळे, सदरचा अर्ज नामंजुर केल्यास वादीचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे. याउलट, प्रतिवादी हे पुणे व नाशिक येथे राहत असुन त्यांचा दावामिळकतीवर कब्जा नाही हे प्रथमदर्शनी दिसुन येते. सदरचा अर्ज मंजुर केल्यास, प्रतिवादींचे कधीही कोणतेही नुकसान होणार नाही. वरील कारणमीमांसेवरून न्यायाचा समतोल तराजु हा वादींच्या बाजुने झुकत आहे. त्यामुळे, नि.क्र. ०५ चा अर्ज मंजुर करणे न्यायोचीत होते. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

०१. नि.क्र. ०५ चा अर्ज मंजुर करण्यांत येत आहे.

०२. प्रतिवादींनी सदर दावामिळकतींमध्ये वादीचा असलेल्या हिस्यापुरता म्हणजे १/४ यावर बोजा निर्माण करू नये, तसेच सदर दावामिळकती त्रयस्थ इसमास तबदील करू नये असा तात्पुरता मनाईहुकूम देण्यात येत आहे.

०३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

सही/—

दिनांक : ११/०१/२०२२

(डि.एम.गित्ते)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कळवण.